# जिल्हा परिषद,कोल्हापूर सरळसेवा पदभरती 2019 व 2021 साठी अर्ज केलेल्या उमेदवारांचे परीक्षा परत करणे बाबत.

---

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या गट क मधील 14 संवर्गातील माहे मार्च 2019 मधील जाहिरात व त्या अनुषंगाने प्राप्त झालेले उमेदवारांचे अर्ज तसेच ऑगस्ट,2021 मधील जिल्हा परिषदांच्या आरोग्य विभागाची चार संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने प्रसिध्द केलेली जाहिरात व संपूर्ण भरती प्रक्रिया शासन निर्णय दि.21 ऑक्टोंबर 2022 अन्वये रद्द करण्यात आली असून जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या उमेदवारांचे शुल्क परत करण्यात येणार आहेत.

उपरोक्त परीक्षेकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांना त्यांचे परीक्षा शुल्क परत करण्याच्या अनुषंगाने https://maharddzp.com या संकेतस्थळावर उमेदवारांसाठी दि.05/09/2023 पासून लिंक सुरु करण्यात आली आहे. तेव्हा मार्च 2019 व ऑगस्ट 2021 च्या अनुषंगाने सरळसेवा पदभरती करीता अर्ज केलेल्या उमेदवारांनी सदर लिंक वापरुन आपली वैयक्तिक माहिती बिनचुक भरणेची आहे.

उमेदवारांनी भरलेली माहितीची पडताळणी करुन जिल्हा परिषद,कोल्हापूर चे सरळसेवा पदभरती करीता ज्या उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत त्यांचे परीक्षा शुल्क अलहिदा आदा करणेची कार्यवाही करणेत येणार आहे.

Scanned with OKEN Scanner